दै आनंद नगरी (10) 29/7

# प्रस्तावीत प्रभाग रचना शिख समाज व मागासवर्गीयांवर अन्यायकारक

## फारूक अहमद यांचा आक्षेप

नांदेड (प्रतिनिधी) – नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या प्रस्तावीत प्रभाग रचना आणि आरक्षण आराखड्यामुळे शिख समाज व मागासवर्गीयांसाठी अन्यायकारक सिद्ध होणारी असल्याचे तीव्र आक्षेप नोंदवून फ ररचना करण्याची मागणी आम आदमी पार्टीचे नेते फारूक अहमद यांनी केली.

निवडणुक आयोगातर्फे मनपा आयुक्त सहित गठीत करण्यात आलेल्या प्रभागरचींना समितीच्या प्रस्तावीत प्रभाग रचना आणि आरक्षण आराखड्यामुळे अल्पसंख्यांक शिख समाजाच्या वस्तींना नियमांचा उल्लंघन करून तीन प्रभागात विभागल्यामुळे शिख समाजाचे मनपा कॉन्सील मधील प्रतिनिधीत्व संपुष्टात येऊन शून्य प्रतिनिधीत्व होण्याची दाट शक्यता असल्यामुळे शिख समाजाच्या वस्तींना प्रभाग क्र. १५, १६, १७ पैकी कोणत्याही एकाच प्रभागात समाविष्ठ करून घेणे न्याय हक्काचे राहिल अशी मागणी करण्यात आली.

अनुसूचित जाती अंतर्गत करण्यात आलेल्या प्रभाग रचना आणि आरक्षण सोडतीने मागासवर्गीय समाजाची अधिक लोकसंख्या असलेल्या प्रभागात न्यायीक प्रतिनिधीत्व देण्याऐवजी तुलनेने कमी संख्या असलेल्या प्रभागात आरक्षण टाकण्यात आल्यामुळे मागासवर्गीय घटकांच्या सम न्यायीक प्रतिनिधीत्व न मिळाल्यामुळे मागासवर्गीय समाज घटकांवर अन्याय होत आहे व अशा कारणाने दलित वार्ड निधी पळवण्याचे घोटाळे होण्यास हेच कारणीभूत ठरण्याची शक्यता आहे. तसेच प्रभाग रचना करत असताना काही अपवादात्मक परिस्थिती नसल्यात ५० टक्के अधिक आरक्षणा टाकू नये असे सर्वोच्च न्यायालयाचे भारत सरकारविरूद्ध आर.के.कुमार (२०१०) १ स्केल २८१ या निर्णयाच्या विरोधात जाऊन प्रभाग क्र. ४, १९, २० मध्ये न्यायालयाचे आदेशाचे उल्लंघन होत असल्याचे तीव्र आक्षेप घेण्यात आले.

यासह प्रभाग क्र. ५ भाग्यनगरची प्रभाग रचना करताना आनंद नगर या मुख्यरस्त्याची विभागणी न करता कैलाशनगर प्रभागात समाविष्ठ करण्यात आले आणि इंद्रानगर परिसराला पाणी पुरवठा क्षेत्र नियमाचा उल्लंघन करून शोभानगर प्रभागात समाविष्ठ करण्यात आल्याचे आक्षेप घेण्यात आले.

२८ रोजी घेण्यात आलेल्या आक्षेप सुनावणीमध्ये आपचे नेते फारूख अहेमद यांनी ऑल इंडिया तंन्जीम -ए-इन्साफ आणि जकात फाऊंडेशन ऑफ इंडिया नवी दिल्लीचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून आपली बाजू मांडली. निवडणुक आयोगाकडून शिख व मागासवर्गीय समाजाला न्याय न मिळाल्यास आपण न्यायालयामध्ये दाद मागणार असल्याचे सुद्धा फारूक अहेमद यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वोर कळविले.

दै पुण्य नगरी

# मनपा प्रभाग रचनेच्या आक्षेपांची सुनावणी

नांदेड / प्रतिनिधी

मनपाच्या आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या ८१ प्रभागाच्या रचनेबाबत दाखल आक्षेपांवर शुक्रवारी मनपाच्या स्थायी समिती सभागृहात प्राधिकृत अधिकारी संतोषकुमार यांच्यासमोर सुनावणी झाली. याबाबत पाच ऑगस्टपर्यंत ते निवडणूक आयोगाला अहवाल सादर करणार असल्याचे सांगण्यात आले.



शहरातील २० प्रभागांतर्गत मनपाच्या ८१ जागांसाठी ऑक्टोबरमध्ये निवडणूक होणार आहे. या निवडणुकीसाठी मनपाने प्रभाग रचना तयार केली आहे त्यावर आक्षेप मागविले होते. एकूण ८२ आक्षेप दाखल झाले होते. मनपा आयुक्त गणेश देशमुख यांनी याबाबत राज्य निवडणूक आयोगाला माहिती दिल्यानंतर आयोगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव संतोषकुमार यांना प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्त केले होते. त्यानुसार संतोषकुमार यांनी शुक्रवारी मनपातील स्थायी समिती सभागृहात सकाळी साडे दहापासून आक्षेपांची सुनावणी घेतली. यात शिवसेनेचे बाळू खोमणे, प्रकाश मारावार, लड्डूसिंघ महाजन, पप्पू जाधव, ॲड.दिलीप ठाकूर, जानीमियाँ,नगरसेविका सौ.खोमणे, श्रावण नरवाडे यांच्यासह अनेकांनी प्रभागनिहाय आक्षेप दाखल केले आणि आपली (पान २ वर..)